# बृहन्मुंबई महानगरपालिका
# कार्यकारी सहायक (लिपिक)
## भरती परीक्षा

# ४३ सराव प्रश्नपत्रिका

आवश्यक तेथे स्पष्टीकरणांसह

**बृहन्मुंबई परिसर व**
**बृहन्मुंबई मनपा विशेष**

- मराठी भाषा आणि व्याकरण
- इंग्रजी भाषा आणि व्याकरण
- बौद्धिक चाचणी
- सामान्यज्ञान व चालू घडामोडी




K'Sagar
PUBLICATIONS


**विनायक घायाळ**
एम्‌एस्‌सी-सेट (केमिस्ट्री)
विद्यापीठात सर्वप्रथम. (गोल्डमेडलिस्ट)

**विद्या देशपांडे**
एमए (इंग्लिश) बीएड
टीईटी–२०१८ उत्तीर्ण

**Published By**
Sau. Shobhadevi Kshirsagar
**K'Sagar Publications**
'Suvarna Shilpa', 444/1 Shaniwar Peth,
Adjacent to Rajmachikar Flour Mill,
Near Dakshinabhimukhi Maruti Temple,
Pune - 411 030. : 9823118810
: (020) 24450125, 24455435

***Email : customer@ksagar.com,***
***sales@ksagar.com***
***website : www.ksagar.com***

© K'Sagar Publications, Pune : 2024
First Edition : 2025

**The name K'Sagar is registered under the trade marks Act, 1999**

**Printed at**
Jai Ganesh Offset
Somavar Peth, Pune

**Typesetting**
K'Sagar Publications, Pune

**Cover Design**
K'Sagar Publications, Pune

**Price : ₹ 460/-**

**K'Sagar Book Centre**
Nutan Classic, 639, Narayan Peth, Appa Balwant Chowk, Pune - 411 030. (020) 24453065 / 9823121395 / 9545567862 / 63

**K'Sagar's House of Books**
Satya-ganesh Sankul, (Saraswati Nivas) 122, Budhwar Peth, Jogeshwari Mandir Lane, Pune - 411 002. (020) 24465650, 9923810566

**K'Sagar's House of Books**
39/1, Durga Chambers, Jogeshwari Mandir Lane, Pune - 411 002 (020) 24483166
9923906500 / 8087722277

Due care has been taken to ensure that the information provided in this book is correct. However, the authors and the publishers bear no responsibility for any damage resulting from any inadvertent omission or inaccuracy in the book.

# के'सागरीय....

**मित्रांनो,**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध विभागांतील कार्यकारी सहायक (लिपिक) एकूण १,८४६ रिक्त पदे भरण्याकरिता जाहिरात प्रकाशित झाली आहे. उमेदवारांची निवड ऑनलाइन परीक्षेतील गुणांच्या आधारे केली जाणार आहे. सदर परीक्षा मराठी माध्यमातून घेण्यात येणार असून या परीक्षेसाठी १०० मिनिटांचा कालावधी विहित करण्यात आला आहे. ऑनलाइन प्रश्नपत्रिका १०० प्रश्नांची व अधिकतम २०० गुणांची असणार आहे.

मराठी भाषा आणि व्याकरण, इंग्रजी भाषा आणि व्याकरण, सामान्यज्ञान व बौद्धिक चाचणी या अभ्यास घटकांवर आधारित ही परीक्षा बहुपर्यायी वस्तुनिष्ठ प्रश्नांच्या स्वरूपात घेतली जाणार असून प्रश्नपत्रिकेचा दर्जा पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान असणे अभिप्रेत आहे.

या परीक्षेकरिता विहित केलेला अभ्यासक्रम लक्षात घेऊन या पुस्तकातील ४३ प्रश्नपत्रिकांची रचना देखील मराठी भाषा व व्याकरण, इंग्रजी भाषा व व्याकरण, बौद्धिक चाचणी, सामान्यज्ञान व चालू घडामोडी या चार घटकांवर आधारलेली आहे. आवश्यक तेथे स्पष्टीकरणांचाही समावेश करण्यात आलेला आहे. सामान्यज्ञान या विषयां–तर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकेसंबधीची प्रश्न विचारण्यात येणार असल्यामुळे पुस्तकाच्या सुरुवातीस बृहन्मुंबई महा–नगरपालिकेसंबधीची महत्त्वाची माहिती मुद्द्यांच्या स्वरूपात दिली आहे.

विनायक घायाळ व विद्या देशपांडे लिखीत विविध संदर्भांची परीक्षाभिमुख रचना लक्षात घेता तलाठी तथा अन्न व नागरी पुरवठा परीक्षेप्रमाणेच हे पुस्तक आगामी परीक्षेसाठी आपला अभ्यास अधिक सखोल करण्यास मदत करील, असा यथार्थ विश्वास वाटतो.

या परीक्षेतील उज्ज्वल यशासाठी आपणांस लक्ष–लक्ष शुभेच्छा!

आपला,
**व्ही. एस. क्षीरसागर**
(K'Sagar)

अभ्यासक्रम समान असल्याने तलाठी ४३ प्रश्नपत्रिका, अन्न नागरी पुरवठा ४३ सराव प्रश्नपत्रिका व प्रस्तुतच्या पुस्तकातील मॅटर समान आहे. माहितीस्तव

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | सराव प्रश्नपत्रिका पहिली | ७ |
| २ | सराव प्रश्नपत्रिका दुसरी | १६ |
| ३ | सराव प्रश्नपत्रिका तिसरी | २३ |
| ४ | सराव प्रश्नपत्रिका चौथी | ३० |
| ५ | सराव प्रश्नपत्रिका पाचवी | ३७ |
| ६ | सराव प्रश्नपत्रिका सहावी | ४३ |
| ७ | सराव प्रश्नपत्रिका सातवी | ४९ |
| ८ | सराव प्रश्नपत्रिका आठवी | ५५ |
| ९ | सराव प्रश्नपत्रिका नववी | ६२ |
| १० | सराव प्रश्नपत्रिका दहावी | ६९ |
| ११ | सराव प्रश्नपत्रिका अकरावी | ७५ |
| १२ | सराव प्रश्नपत्रिका बारावी | ८२ |
| १३ | सराव प्रश्नपत्रिका तेरावी | ८९ |
| १४ | सराव प्रश्नपत्रिका चौदावी | ९६ |
| १५ | सराव प्रश्नपत्रिका पंधरावी | १०३ |
| १६ | सराव प्रश्नपत्रिका सोळावी | १०९ |
| १७ | सराव प्रश्नपत्रिका सतरावी | ११५ |
| १८ | सराव प्रश्नपत्रिका अठरावी | १२३ |
| १९ | सराव प्रश्नपत्रिका एकोणिसावी | १३१ |
| २० | सराव प्रश्नपत्रिका विसावी | १३९ |
| २१ | सराव प्रश्नपत्रिका एकविसावी | १४६ |
| २२ | सराव प्रश्नपत्रिका बाविसावी | १५३ |
| २३ | सराव प्रश्नपत्रिका तेविसावी | १५९ |
| २४ | सराव प्रश्नपत्रिका चोविसावी | १६७ |
| २५ | सराव प्रश्नपत्रिका पंचविसावी | १७५ |
| २६ | सराव प्रश्नपत्रिका सव्विसावी | १८३ |
| २७ | सराव प्रश्नपत्रिका सत्ताविसावी | १९१ |
| २८ | सराव प्रश्नपत्रिका अठ्ठाविसावी | २०० |
| २९ | सराव प्रश्नपत्रिका एकोणतिसावी | २०७ |
| ३० | सराव प्रश्नपत्रिका तिसावी | २१४ |
| ३१ | सराव प्रश्नपत्रिका एकतिसावी | २२१ |
| ३२ | सराव प्रश्नपत्रिका बत्तिसावी | २२८ |
| ३३ | सराव प्रश्नपत्रिका तेहेतिसावी | २३४ |
| ३४ | सराव प्रश्नपत्रिका चौतिसावी | २४० |
| ३५ | सराव प्रश्नपत्रिका पस्तिसावी | २४६ |
| ३६ | सराव प्रश्नपत्रिका छत्तिसावी | २५४ |
| ३७ | सराव प्रश्नपत्रिका सदतिसावी | २६१ |
| ३८ | सराव प्रश्नपत्रिका अडतिसावी | २६९ |
| ३९ | सराव प्रश्नपत्रिका एकोणचाळिसावी | २७६ |
| ४० | सराव प्रश्नपत्रिका चाळिसावी | २८५ |
| ४१ | सराव प्रश्नपत्रिका एकेचाळिसावी | २९६ |
| ४२ | सराव प्रश्नपत्रिका बेचाळिसावी | ३०५ |
| ४३ | सराव प्रश्नपत्रिका त्रेचाळिसावी | ३१४ |
| ■ | चालू घडामोडी | ३२३ |

## बृहन्मुंबई महानगरपालिका

(1) बृहन्मुंबई महानगरपालिका ही, नागरी प्रशासनाच्या दृष्टीने महत्त्वाची जबाबदारी पार पाडणारी प्रमुख संस्था असून, बृहन्मुंबई महानगरपालिकेचा आशिया खंडातील सर्वांत मोठी स्थानिक स्वराज्य संस्था असा नावलौकिक आहे.

(2) बृहन्मुंबई महानगरपालिकेचे कामकाज मुंबई महानगरपालिका अधिनियम, 1888 अन्वये पाहिले जाते. या अधिनियमास पूर्वी 1888 चा मुंबई अधिनियम क्रमांक तीन व त्यानंतर 1888 चा मुंबई शहर महानगरपालिका अधिनियम असे उल्लेखिण्यात येत होते. या अधिनियमास मूर्त स्वरूप देण्याच्या विधेयकास भारताच्या गव्हर्नर जनरलची अनुमती मिळाली आणि 14 सप्टेंबर, 1888 रोजी मुंबईच्या राज्यपालांतर्फे तो प्रथमत: प्रकाशित करण्यात आला. पुढे 1950 मध्ये या अधिनियमाचे नाव 'मुंबई महानगरपालिका अधिनियम' असे करण्यात आले. त्यावेळी ठाणे जिल्ह्यातील सालसेटी तालुक्याचा भाग समाविष्ट करण्यासाठी महानगरपालिकेची हद्द उत्तरेकडे वाढविण्यात आली. 1 फेब्रुवारी, 1957 रोजी हा भाग पुढे आणखी वाढविण्यात आला. तद्नंतर ही महानगरपालिका 'बृहन्मुंबई महानगरपालिका' या नावाने ओळखली जाऊ लागली.

(3) बृहन्मुंबई महानगरपालिकेचे भौगोलिक क्षेत्रफळ हे शहर विभाग– 68.71 चौ.कि.मी., पश्चिम उपनगरे– 210.54 चौ.कि.मी. व पूर्व उपनगरे– 158.46 मिळून एकूण 437.71 चौ.कि.मी. एवढे आहे.

(4) 2011 च्या जनगणनेआधारे मुंबई शहराची एकूण लोकसंख्या सुमारे 1.25 कोटी इतकी आहे.

(5) मुंबई शहर जगातील सर्वांत जास्त लोकसंख्येची घनता असलेल्या शहरांपैकी एक शहर असून भौगोलिक आणि भौतिक संरचनांमुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेची भूमिका नागरी सुविधा पुरविण्याच्यादृष्टीने आव्हानात्मक आहे.

(6) संपूर्ण मुंबई शहराची 24 विभागांसह सात प्रशासकीय परिमंडळांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. या सात परिमंडळांवर आपल्या अधिपत्याखाली काम करणाऱ्या सहायक आयुक्तांसह महानगरपालिका उप आयुक्त पर्यवेक्षण करतात.

## महानगरपालिकेच्या विकासातील प्रमुख टप्पे

| वर्ष | घटना |
|---|---|
| 1807 | कोर्ट ऑफ पेटी सेशन्सची स्थापना–दोन मॅजिस्ट्रेटस् आणि एक जस्टिस ऑफ पीस. |
| 1845 | नागरी सप्तप्रधान मंडळ. |
| 1858 | त्रिसदस्य आयुक्त मंडळ. |
| 1865 | एक महापालिका आयुक्त आणि जस्टिसेस् ऑफ पीस मिळून बनलेले मंडळ. |
| 1872 | 64 सदस्य असलेल्या महापालिकेची रीतसर स्थापना. करदात्यांना मतदानाचा अधिकार |
| 1873 | लोकशाही पद्धतीवर आधारित महानगरपालिकेची पहिली सभा, 4 सप्टेंबर, 1873 रोजी भरली. |
| 1907 | प्राथमिक शिक्षणविषयक संपूर्ण जबाबदारी महापालिकेकडे सोपविण्यात आली. |
| 1922 | फक्त करदात्यांऐवजी, भाडेकरूंनाही मतदानाचा अधिकार प्राप्त झाला. |
| 1931 | 'अध्यक्ष' हे नामाभिधान 'महापौर' असे करण्यात आले. |
| 1947 | 7 ऑगस्ट, 1947 रोजी बेस्ट कंपनी लिमिटेड महानगरपालिकेत विलीन झाली. |
| 1948 | प्रौढ मतदान पद्धती प्रथमच अस्तित्त्वात आली. |
| 1950 | उपनगर विभाग महानगरपालिकेत विलीन करण्यात आले. |
| 1952 | महानगरपालिकेवर काही खास प्रतिनिधी पदसिद्ध सदस्य म्हणून काम करीत असत. (जसे– पोलीस आयुक्त; बी. पी. टी. चे अध्यक्ष; कार्यकारी अभियंता, इलाखा विभाग सार्वजनिक बांधकाम खाते, मुंबई शासन; इत्यादी) ही पद्धत बंद करण्यात आली. त्यामुळे मुंबई महानगरपालिका खऱ्या अर्थाने लोकप्रातिनिधिक संस्था बनली. |

**प्रथम ब्रिटिशांच्या ताब्यात असलेले बॉम्बे (तत्कालीन नाव) हे बेट १६६१ मध्ये इंग्लंडचे राजे चार्ल्स दुसरा यांना पोर्तुगीज राणी इंफंटा कॅथरीन डी ब्रॅगांजा हिच्यासोबत विवाह झाल्याबद्दल आंदण म्हणून देण्यात आले होते.**

| | |
|---|---|
| 1957 | विस्तारित उपनगरे महानगरपालिकेत विलीन करण्यात आली. |
| 1972 | महानगरपालिकेच्या कामकाजाची अधिकृत भाषा म्हणून मराठीस (राज्यभाषा) मान्यता देण्यात आली. |
| 1973 | महानगरपालिकेची शताब्दी साजरी करण्यात आली. |
| 1976 | अनुसूचित जातींच्या नगरसेवकांकरिता मतदारसंघ राखीव ठेवण्यात आले. |
| 1982 | 25 मार्च, 1982 या दिवशी महापौरपदाचा सुवर्ण-महोत्सव संपन्न झाला. |
| 1984 | 1 एप्रिल, 1984 पासून प्रशासकाची नियुक्ती. |
| 1987 | मुंबई अग्निशमन दलाचा शताब्दी सोहळा साजरा करण्यात आला. |
| 1989 | राज्य शासनाने मतदानासाठी अधिसूचित केलेल्या तारखेला वयाची अठरा वर्षे पूर्ण केलेल्या व्यक्तींना महानगरपालिका निवडणूक यादीत नाव नोंदविण्याचा अधिकार प्राप्त झाला. |
| 1990 | ■ कोणतीही सर्वसाधारण निवडणूक किंवा पोट-निवडणूक यांसाठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या अंतिम तारखेपर्यंत वयाची 21 वर्षे पूर्ण करणाऱ्या व्यक्तीस विभागीय निवडणुका लढविण्याचा अधिकार प्राप्त झाला.<br>■ एकूण जागांपैकी 30 टक्के जागा (अनुसूचित जातीच्या महिला उमेदवारांकरिता राखून ठेवलेल्या जागांसहित), महिलांसाठी राखून ठेवण्यात आल्या. |
| 1991 | 1 एप्रिल, 1991 पासून वडाळा येथील 'ॲक्वर्थ लेप्रसी रुग्णालय' बृहन्मुंबई महानगरपालिकेने ताब्यात घेऊन त्याचे नामकरण 'कुष्ठरोग्यांकरिता ॲक्वर्थ महानगरपालिका रुग्णालय' असे केले. |
| 1992 | ■ 12 मार्च, 1992 रोजी, संसर्गजन्य रोगांकरिता असलेल्या 'कस्तुरबा रुग्णालया'चा शताब्दी सोहळा साजरा करण्यात आला.<br>■ 29 मार्च, 1992 रोजी तानसा येथे 'तानसा धरण' शताब्दी महोत्सव पार पडला. |

| | |
|---|---|
| 1994 | 74 व्या घटना दुरुस्तीच्या अनुषंगाने, 1994 च्या महाराष्ट्र अधिनियम क्र. 41 अन्वये, मुंबई महा-नगरपालिका अधिनियमात पुढील महत्त्वाच्या दुरुस्त्या करण्यात आल्या–<br>1. महानगरपालिकेवर पाच नामनिर्देशित सदस्यांची नियुक्ती.<br>2. अनुसूचित जाती/जमाती, इत्यादींमधील आरक्षणासहित महिलांसाठी एक-तृतीयांश जागांचे आरक्षण.<br>3. एकूण सदस्य संख्येपैकी 27 टक्के जागा मागासवर्गीय नागरिकांसाठी आरक्षित.<br>4. महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालिकां-मधील महापौरपदाकरिता अनुसूचित जाती/जमाती, मागासवर्गीय नागरिक आणि महिला यांच्याकरिता आळीपाळीने आरक्षण.<br>5. महानगरपालिका निवडणुकीच्या बाबतीत पर्यवेक्षण, मार्गदर्शन आणि नियंत्रण हे अधिकार महानगरपालिका आयुक्तांऐवजी राज्य निवडणूक आयुक्तांना देण्यात आले.<br>6. प्रभाग समित्यांची स्थापना. |
| 1996 | ■ महापौरपद मागासवर्गीय नागरिकांसाठी आरक्षित. तदनुसार, प्रथमच महापौरांची नियुक्ती.<br>■ बॉम्बे चे मुंबई असे नामकरण |
| 1997 | 10 मार्च, 1997 रोजी प्रथमच पाच नामनिर्देशित सदस्यांची नियुक्ती करण्यात आली. |
| 1998 | मुंबई महानगरपालिका अधिनियम, 1888 मध्ये सुधारणा करण्यात येऊन 19 एप्रिल, 1998 पासून बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये 'महापौरांसह परिषद पद्धती' लागू करण्यात आली. |
| 1999 | ■ महापौरांसह परिषद पध्दती रद्द करून, मुंबई महानगरपालिकेत जुन्या पद्धतीचे पुनरुज्जीवन |

**महाराष्ट्र अधिनियम, १९९६ च्या कलम पंचवीस अंतर्गत, महानगरपालिकेचा दिनांक १२ ऑगस्ट, १९९६ चा ठराव क्रमांक ५१२ अन्वये 'बॉम्बे' चे 'मुंबई' असे नामकरण करण्यात आले.**

| | |
|---|---|
| | करण्यात आले. त्याअनुषंगाने 29 एप्रिल, 1999 रोजी महापौर निवडणूक घेण्यात आली.<br>■ उपमहापौर आणि विरोधी पक्षनेता, या पदांची तरतूद करण्यात आली.<br>■ महापौरांस विवक्षित अधिकार देण्यात आले. |
| 2000 | महापौर आणि उपमहापौर यांच्या पदांचा कालावधी अडीच वर्षांपर्यंत वाढविण्यात आला. |
| 2002 | ■ सदस्यांची संख्या 221 वरून 227 इतकी करण्यात आली.<br>■ 'सभागृह नेता' या पदाची तरतूद करण्यात आली.<br>■ सन 2002-03 हे वर्ष 'राजे एडवर्ड स्मारक रुग्णालया'चे अमृत महोत्सवी वर्ष म्हणून साजरे करण्यात आले. |
| 2022 | ऑगस्ट, 2022 मध्ये महानगरपालिकेची सदस्य-संख्या 227 इतकी पुनर्निश्चित करण्यात आली. |

## महानगरपालिकेची रचना

1. येथे 'महानगरपालिका' या संज्ञेचा अर्थ म्हणजे मुंबई महानगरपालिका अद्ययावत अधिनियम 1888 अंतर्गत गठीत बृहन्मुंबई महानगरपालिका असा होतो.
2. महानगरपालिकेच्या रचनेमध्ये प्रभाग निवडणुकांमध्ये प्रत्यक्ष निवडून आलेले 227 नगरसेवक आणि ज्यांना महापालिका प्रशासनाशी निगडित विशेष माहिती आहे अथवा अनुभव धारण केलेला आहे, असे महानगर-पालिकेने नामनिर्देशित केलेले 5 नगरसेवक यांचा समावेश होतो. (कलम 3 आणि 5).
3. महानगरपालिकेचा कार्यकालावधी तिच्या पहिल्या सभे-पासून 5 वर्षांचा असतो. (कलम 6).
4. नगरसेवकांचा कार्यकाल हा महानगरपालिकेच्या कार्य-कालावधी इतकाच असतो. (कलम 6 अ).
5. 15 फेब्रुवारी, 2007 च्या शासन अध्यादेशान्वये सर्व-साधारण निवडणुकीनंतर महानगरपालिकेने पहिल्या विशेष सभेत नगरसेवकांमधून एकाची महापौर आणि दुसऱ्याची उपमहापौर म्हणून निवड करावयाची असते.
6. इतर प्रत्येक बाबतीत महापौर हे सभा निश्चित करतात, अथवा त्यांच्या अनुपस्थितीत उपमहापौर किंवा अध्यक्ष, स्थायी समिती हे सभा निश्चित करतात.
7. महानगरपालिका विविध समित्याचे सदस्य नामनिर्देशित करते जसे की– (1) वैधानिक समिती, (2) विशेष समिती, (3) सल्लागार समिती आणि (4) महा-नगरपालिकेच्या उपसमित्या.

## महानगरपालिकेचे कामकाज

1. महानगरपालिका, मुख्य कार्यालय येथे कामकाजाकरिता आपल्या सभा भरवून अशा सभा निमंत्रित करणे; अशा सभांची सूचना, जागा आणि व्यवस्थापन; त्या सभा तहकूब करणे याविषयी तसेच सर्वसाधारणपणे कलम 66अ अंतर्गत महानगरपालिकेचे कामकाज चालविण्या-च्या आणि तिचे व्यवस्थापन करण्याच्या पद्धतीविषयी तिला योग्य वाटतील असे विनियम वेळोवेळी करते.
2. कलम 36 अन्वये– प्रत्येक महिन्यात एक सर्वसाधारण सभा भरविण्यात येते.
3. 15 फेब्रुवारी, 2007 च्या शासन अध्यादेशान्वये, महापौर आणि उपमहापौर यांच्या निवडणुकीकरीता, महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीनंतरच्या मार्च महिन्यात पहिली विशेष सभा घेण्यात येते. या सभेचा दिवस, वेळ आणि ठिकाण हे महानगरपालिकेचा सचिव/चिटणीस (Municipal Secretary) यांनी माजी महापौर आणि आयुक्त यांच्याशी सल्लामसलत करून निश्चित करावयाची असते.
4. प्रत्येक सभेच्या सूचनेमध्ये सभेचा दिवस, वेळ आणि सभेचे ठिकाण तसेच सभेमध्ये करावयाचे कामकाज यांचा तपशिल नमूद केला जातो. याकरीता महानगरपालिका सचिवांनी (Municipal Secretary) स्थानिक वर्तमान-पत्रांत जाहिरात द्यावयाची असते आणि सदस्यांना त्यांच्या निवासस्थान पत्त्यावर सहपत्रांसहित सभेची कार्यक्रम-पत्रिका वितरीत करावयाची असते.
5. महापौर अथवा त्यांच्या अनुपस्थितीमध्ये उपमहापौर किंवा अध्यक्ष, स्थायी समिती यांना, एकूण नगरसेवक संख्येच्या एक षष्ठांशपेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यां-नी स्वाक्षरीसह लेखी विनंती केल्यास महानगरपालिकेची विशेष सभा बोलावता येईल. (कलम 36 (ड)).

6. महानगरपालिकेच्या सभेचे कामकाज चालविण्याकरिता, सभेपूर्वी, एकूण नगरसेवक संख्येच्या एक पंचमांश इतकी गणसंख्या आवश्यक असते. (कलम 36 फ)
7. प्रत्येक सभेचे पीठासीन अधिकारी हे महापौर असतात, अथवा महापौरांच्या अनुपस्थितीत उपमहापौर आणि महापौर व उपमहापौर या दोघांच्याही अनुपस्थितीत सभेमध्ये उपस्थित असलेल्या नगरसेवकांमधून एकाची, सभेच्या प्रासंगिक काळाकरिता पीठासीन अधिकारी म्हणून निवड करण्यात येते.
8. आयुक्तांना, अथवा आयुक्तांच्या अनुपस्थितीत अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त, उपआयुक्त किंवा संचालक यांना महानगरपालिकेच्या सभेस उपस्थित राहण्याचा तसेच सभेत होणाऱ्या चर्चेत भाग घेण्याचा अधिकार आहे. तथापि, त्यांना अशा सभेत कोणत्याही प्रस्तावावर मतदान करण्याची किंवा प्रस्ताव मांडण्याची मुभा नसते.
9. मुंबई महानगरपालिका अद्ययावत अधिनियम कलम 127 अन्वये, मार्च महिन्याच्या 10 तारखेला किंवा त्यापूर्वी महानगरपालिका सभेत, स्थायी समितीने तयार केलेले अर्थसंकल्पीय अंदाज 'अ', 'ब', आणि 'क' तसेच शिक्षण समितीने तयार केलेले अर्थसंकल्पीय अंदाज 'ई', यासह स्थायी समितीचा त्यावरील अहवाल हे विचारविनिमयाकरिता आणि अंतिम मंजुरीकरीता महानगरपालिकेसमोर मांडण्यात येतात.

## प्रमुख प्रशासकीय अधिकारी

**(1) महानगरपालिका आयुक्त :** महानगरपालिका आयुक्तांची नियुक्ती महाराष्ट्र शासनाकडून मुंबई महापालिका अधिनियम कलम 54 अंतर्गत करण्यात येते. शहरातील विविध मुलभूत सेवा-सुविधा उदाहरणार्थ- पाणीपुरवठा, रस्ते, पर्जन्य जलवाहिन्या, सांडपाणी यांचे परिरक्षण करण्याची तसेच विविध सेवा परिणामकारकरित्या नागरिकांपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी त्यांच्यावर असते. त्यांना आपली कर्तव्ये पार पाडण्यासाठी अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त, महानगरपालिका उपायुक्त, सहायक आयुक्त आणि विविध खात्यांचे प्रमुख मदत करीत असतात.

**(2) अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त :** अतिरिक्त महानगरपालिका आयुक्तांची नेमणूक महाराष्ट्र शासनामार्फत मुंबई महानगरपालिका अधिनियम कलम 54 अंतर्गत केली जाते. महानगरपालिका आयुक्तांनी त्यांना नेमून दिलेल्या खात्यांकरिता आयुक्त म्हणून ते कार्यरत असतात. सद्य:स्थितीत चार अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त कार्यरत आहेत.

**(3) महानगरपालिका उपआयुक्त :** महानगरपालिका उपआयुक्तांची नेमणूक मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या विविध कलमाअंतर्गत आणि महानगरपालिका आयुक्त/अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त यांना त्यांच्या जबाबदाऱ्या निभावताना साहाय्य करावे म्हणून केली जाते. उपआयुक्तांची नेमणूक महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र शासनाच्या संमतीने करण्यात येते.

**(4) सहायक आयुक्त :** सहायक आयुक्त हे विभागांचे प्रशासकीय प्रमुख असतात आणि नागरिकांना दैनंदिन सेवा-सुविधा पुरविण्यामध्ये त्यांची मुख्य भूमिका असते. मुंबई महानगर हे 24 प्रशासकीय विभागांमध्ये विभागले असून या प्रत्येक विभागाचे प्रमुख हे सहायक आयुक्त असतात. (पूर्वी त्यांना विभाग अधिकारी म्हणून ओळखले जात असे.) त्यांची नेमणूक महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या शिफारशींनुसार महानगरपालिका करीत असते.

**(5) महानगरपालिकेची खाती :** प्रत्येक खात्याचे प्रमुख हे 'खातेप्रमुख' म्हणून ओळखले जातात आणि त्यांची नियुक्ती महानगरपालिका करीत असते.

## महानगरपालिकेचे प्रमुख विभाग

**सामान्य प्रशासन विभाग :** सामान्य प्रशासन विभागाची रचना पुढीलप्रमाणे असते-

**महानगरपालिका आयुक्त**
↓
अतिरिक्त आयुक्त (शहर)
↓
उपआयुक्त (सामान्य प्रशासन)
↓

| | | | |
|---|---|---|---|
| प्रमुख कर्मचारी अधिकारी | प्रमुख कामगार अधिकारी | उप-प्रमुख लेखापाल (आस्थापना) | मानव संसाधन विभाग |

**जल विभाग :** 'जल अभियंता' हे जल खात्याचे प्रमुख असून हे वैधानिक पद आहे. जल स्रोतातून पाण्याचा उपसा करून त्याचे वहन, प्रक्रिया, साठवणूक व नागरिकांपर्यंत वितरण करण्यासाठीची लागणारी संपूर्ण व्यवस्था व कर्मचारी वर्ग त्यांच्या अखत्यारित येतात. महानगरपालिकेचे एकूण 24 विभाग असून, 'सहायक अभियंता (जलकामे)' हे प्रत्येक विभागातील जलकामे खात्याचे प्रमुख आहेत. ते सदर विभागातील पाणी वितरण करणे, पाणी पुरवठा व्यवस्थेचे परिरक्षण करणे, जलदेयकांची निर्मिती व पाणी वितरणासंबंधी असलेल्या सर्व समस्यांचे निवारण करणे इत्यादी सेवा पुरवितात.

महानगरपालिकेचे पाण्याचे 7 स्रोत पुढीलप्रमाणे आहेत– भातसा, अप्पर वैतरणा, मध्य वैतरणा, मोडक सागर, तानसा, विहार आणि तुळशी. त्यांपैकी तुळशी आणि विहार हे तलाव मुंबई शहरामध्ये आहेत व मुंबई शहराला होणाऱ्या संपूर्ण पाणीपुरवठ्यापैकी 2.5 टक्के पाणी पुरवठा या तलावांतून उपलब्ध होतो. उर्वरित 97.5 टक्के पाणी पुरवठा हा शहरापासून 100 कि. मी. पेक्षा जास्त लांब असलेल्या तलावांतून केला जातो.

**शिक्षण विभाग :** मुंबई महानगरपालिका अधिनियमा-मधील कलम 50(ग)(1) नुसार शिक्षण समितीची रचना करण्यात आली आहे. मुंबई परिक्षेत्रातील सरकारी शाळा सन 1888 पासून मुंबई महानगरपालिकेत सामाविष्ट झाल्या आहेत. मनपा शाळांमधून सेमी इंग्रजी वर्ग सन 2013-14 पासून 287 शाळांमधून सुरू करण्यात आले व सन 2018-19 पासून 732 शाळांमधून प्रथम भाषा मराठी बरोबरच प्रथम भाषा इंग्रजीही सुरू करण्यात आली.

**नियोजन विभाग :** महानगरपालिकेमध्ये सन 1993 मध्ये या विभागाची स्थापना करण्यात आली. या विभागाचे कार्य जिल्हा वार्षिक योजनांची अमंलबजावणी करणे, आमदार/खासदार विकास कार्यक्रमांकरिता समन्वय साधणे, महिला व बाल कल्याण योजनांची अंमलबजावणी करणे व राज्य शासनाच्या निर्देशानुसार इतर कार्य करणे हे आहे. सहायक आयुक्त (नियोजन) हे या विभागाचे प्रमुख असून त्यांच्या मदतीस संशोधन अधिकारी व सहायक संशोधन अधिकारी असतात.

**जनसंपर्क विभाग :** 1956 मध्ये बृहन्मुंबई महानगर-पालिका मुख्यालयात 'जनसंपर्क विभागा'ची स्थापना झाली. महानगरपालिकेच्या वतीने नागरिकांना देण्यात येणाऱ्या नागरी सेवा-सुविधा, महापालिकेच्या विविध खात्यांनी राबविलेले उपक्रम यांची माहिती वार्तापत्रे, वृत्तपत्रीय जाहिराती, स्टिकर्स, भित्तिपत्रके, वृत्तपत्रीय लेख तसेच दूरदर्शन व खासगी दूरचित्र वाहिन्यांद्वारे तसेच सोशल मीडिया, सिनेमा स्लाईड्स, प्रदर्शने, लघु चित्रफिती, लघुसंदेश या विविध प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्धी देण्याचे काम जनसंपर्क विभाग करतो.

**वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान व प्राणिसंग्रहालय :** सन 1862 मध्ये स्थापन झालेले; सध्या 53 एकर क्षेत्रफळ असलेले वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान व प्राणिसंग्रहालय, हे देशातील जुन्या प्राणिसंग्रहालयांपैकी एक आहे. या उद्यान व प्राणिसंग्रहालयाला 'पुरातन वास्तू श्रेणी दोन-ब' क्षेत्र घोषित करण्यात आले असून केन्द्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरण, नवी दिल्ली– पर्यावरण, वने आणि जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार यांनी या प्राणिसंग्रहालयास 'मध्यम प्राणिसंग्रहालय' अशी मान्यता दिली आहे. हे उद्यान व प्राणिसंग्रहालय बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाच्या अखत्यारीमध्ये असून संचालक (प्राणिसंग्रहालय) हे खातेप्रमुख आहेत.

**महत्त्वाचा बदल**

(1) राज्यातील औरंगाबाद या शहराचे छत्रपती संभाजीनगर तर उस्मानाबाद शहराचे धाराशिव, याप्रमाणे नामांतर करण्यात आले आहे. विद्यार्थिमित्रांनी कृपया वरील बदलांची नोंद घ्यावी.

(2) अहमदनगर शहराचे तसेच जिल्ह्याचे नामकरण 'अहिल्यानगर' असे करण्यास 13 मार्च, 2024 रोजी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या बाबत केंद्र शासनाची मान्यता प्रतिक्षाधीन आहे. या अनुषंगाने पुढील घडामोडींकडे लक्ष असू द्यावे.